UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-२]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे      डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

| | | |
|---|---|---|
| ३३. | छत्रपती शिवाजी महाराजांची इतिहासप्रसिद्ध सुरतेची लूट : एक दृष्टिक्षेप<br>- तेजस शांताराम रेवाळे | ११६ - ११९ |
| ३४. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- अनिता आत्माराम पवार | १२० - १२४ |
| ३५. | छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा आरमारविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. दराडे संभाजी सोपानराव व प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर | १२५ - १२८ |
| ३६. | महात्मा फुलेलिखित छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे व डॉ. ललिता मानसिंग गोपाळ | १२९ - १३५ |
| ३७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- प्रा . प्रदीप इन्सुलकर व प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर | १३६ - १३९ |
| ३८. | शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन. | १४० - १४१ |
| ३९. | शिवविचार – छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा<br>- प्रफुल्लसिंग सुवर्णसिंग राजपूत व प्रा. डॉ. भा.ना. गाडेकर | १४२ - १४७ |
| ४०. | कृष्णराव अर्जुन केळूसकरलिखित क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज चरित्राची मीमांसा - डॉ. सहदेव शरद चव्हाण | १४८ - १५१ |
| ४१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे : व्यक्तित्त्व<br>- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर महादराव गाडे | १५२ - १५४ |
| ४२. | शिवकालीन खान्देशातील उद्योग व व्यापार : एक दृष्टिक्षेप<br>- प्रा. डॉ. ए. जी. सोनवणे | १५५ - १५८ |
| ४३. | शिवकालीन शस्त्रास्त्रे<br>- प्रा. डॉ. रमाकांत अंबादास चौधरी | १५९ - १६२ |
| ४४. | शिवकालीन बखर वाङ्मय<br>- डॉ. रश्मी शेट्ये-तुपे | १६३ - १६५ |
| ४५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. दिलीप सावंत | १६६ - १६८ |
| ४६. | शिवकालीन नाणी - एक अभ्यास<br>- प्रा. दिकोंडा रूपाली गोवर्धन | १६९ - १७१ |
| ४७. | हिंदवी स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>- प्रा. डॉ. स्वाती रा. सरोदे | १७२ - १७५ |
| ४८. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित | १७६ - १८२ |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



# महात्मा फुलेलिखित 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा'

- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे
मराठी विभागप्रमुख, मशिसे गट- 'अ'
शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद

- डॉ. ललिता मानसिंग गोपाळ
श्री. आसारामजी भांडवलदार कला,
वाणिज्य विज्ञान महाविद्यालय,
देवगाव (रं.)

छत्रपती शिवाजी महाराजांचा आज जो जगभरातील समाजमनावर प्रचंड प्रभाव आहे, तो फक्त त्यांनी जिंकलेल्या लढाया यामुळेच नाही, तर त्यांनी स्वराज्यात अमलात आणलेल्या अनेक लोककल्याणकारी यशस्वी योजना यांच्यामुळे आहे. ते प्रजेचे रक्षक, स्त्रीरक्षक, धर्मसुधारक, विज्ञानवादी, मानवतावादी, दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते, असे कितीतरी पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे सांगता येतील. मात्र, शिवरायांचे चरित्र आणि त्यांचे कार्य यासंदर्भात अत्यंत खोट्या प्रतिमा, प्रतीके वापरून त्यांचे खरे चरित्र, कार्य यांचा सावळागोंधळ निर्माण केला गेला आहे. सामान्य जनमानसावर पोवाडे, बखर गद्य, दंतकथा, टी.व्ही. वाहिन्या आणि काही प्रस्थापितांनी शिवरायांच्या चरित्र व कार्याचे उदात्तीकरण, दैवीकरण, अलौकिकीकरण करून त्यांचे खरे कर्तृत्व झाकाळून टाकले आहे. गौ-ब्राह्मण प्रतिपालक, हिंदुपदपादशाह असा गौरव करून शिवरायांच्या मानवतावादी दृष्टीला तिलांजली देण्याचा काही लोक अधूनमधून प्रयत्न करून सामान्य माणसांची दिशाभूल करताना दिसतात. वास्तविक पाहता शिवरायांच्या चरित्र आणि कार्याच्या अनुषंगाने महात्मा जोतीराव फुले यांचा 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' (१८६९) जर अभ्यासला तर त्यामध्ये शिवरायांचे चरित्र व कर्तृत्वाची अस्सल माहिती मिळते. याकडे वाचक आणि अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले आहे.

'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' (१८६९) लिहिताना महात्मा फुले यांनी मुख्यत: ग्रँट डफच्या 'हिस्ट्री ऑफ मराठाज' व मरी यांच्या लेखी इतिहासाचा आधार घेतलेला आहे. जोतीरावांनी शिवरायांचे चरित्र व कर्तृत्व सांगण्यासाठी 'पोवाडा' रचनाप्रकाराची निवड जाणीवपूर्वक केली. जोतीराव पोवाड्याला 'पवाडा' हा शब्द योजतात. त्याला बोलीभाषेचा जाणीवपूर्वक वापर करणे हेच कारण असावे. जोतीरावांनी लिहिलेला पोवाडा म्हणजे त्यांनी आधारभूत मानलेल्या इंग्रजी गद्याचा 'पद्य' अनुवाद नाही. जोतीराव फुले यांनी त्यांच्या स्वतंत्र तार्किक आणि बौद्धिक कुवतीनुसार वास्तवरूपात हा पोवाडा लिहिला आहे. या पोवाड्याचे २३ चौक आहेत. एका चौकात साधारणपणे ५ ते ११६ पर्यंत चरणसंख्या आहे. म्हणजेच जोतीरावांनी चौकांच्या रचनेत ओळीचे, चरणांचे अथवा वृत्तांचे बंधन पाळलेले नाही. जोतीवारांनी शिवचरित्र सांगण्यासाठी पोवाडा रचनाप्रकार निवडला. यासंदर्भात श्रीराम गुंदेकर लिहितात, "अभिनव आशयाबरोबरच त्यात तत्त्व, विचार, नीती, बोध, चिंतन, ध्यास हे गुण आहेत. तसेच उत्स्फूर्तता, जोरकसपणा, चैतन्य, आवेग ही वैशिष्ट्ये आहेत."[१] याशिवाय मला वाटते याविषयी ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली तरी, आपल्याला एक गोष्ट लक्षात येते की, 'पोवाडा' हे अभिव्यक्तीचे माध्यम जनमानसाची लवकर पकड घेते. कथाविकास, भाव उत्पत्ती, प्रसंगनिर्मिती यासही हा रचनाप्रकार पूरक आहे. हे थोडे फुले यांचे वाङ्मय रचनाबंधाच्या अनुषंगाने झाले.

**महात्मा फुले यांचे पोवाडा वाङ्मय -**

जोतीराव फुले यांनी एकूण जे काव्यलेखन केले त्यात त्याच्या 'पोवाडा' रचना प्रकाराला महत्त्वाचे स्थान आहे.

१. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा (१८६९)
२. भट कामगार इंजिनिअर खात्यात कशी पेंढारगर्दी करतात याविषयी पवाडा
३. ब्राह्मणांचे कसब (पवाडा)
४. दस्यूचा पवाडा



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

उपरोक्त महात्मा फुले यांच्या पोवाड्यांमध्ये सर्वात महत्त्वाची त्यांची रचना म्हणजे 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' (१८६९) अत्यंत महत्त्वाचा आहे.

**हेतू / प्रयोजन -**

महात्मा जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला नवे ऐहिक किंबहुना लौकिक परिमाण दिले. शिवरायांचे लोकहितार्थ कार्य जर आपण पाहिले, तर जोतीरावांनी शिवरायांना बळीराजाच्या आधुनिक प्रतिनिधीच्या स्वरूपात स्वीकारले हे विशेष होय. ते प्रस्तावनेत लिहितात, "कुणबी माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांच्या उपयोगी हा 'पवाडा' पडावा असा माझा हेतू आहे."[३] 'ब्राह्मणांचे कसब' हे जोतीराव फुले यांचे छोटेसे; पण प्रसिद्ध असे पुस्तक आहे. या ग्रंथाचा हेतू स्पष्ट करताना ते म्हणतात, आमच्या देशात ब्राह्मणांचे महत्त्व किती आहे व धर्माच्या मिषाने ते लोकांवर अतिशय जुलूम करतात. त्यांना असेही वाटत होते की, आमच्या समदृष्टी क्षत्रियशूद्रादींना अतिउपयोगी पडेल या भूमिकेतून ते जागृत होतील.

महात्मा फुले शिवरायांना 'कुळवाडीभूषण' असे बिरुद लावतात. त्यांना तत्कालीन परिस्थितीत एक गोष्ट जाणवली होती की, शिवरायांचा खोटा इतिहास रचून काही लोक समाजाची दिशाभूल करीत आहेत. तेव्हा या राजाचा खरा इतिहास लोकांसमोर आला पाहिजे. यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी आपली भूमिका मांडली होती. २ जून १८८६ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, "अलीकडे भट ब्राह्मणांची विद्वान पोरेसोरे नवीन पवाडे तयार करून हळूच मैदानात आणीत आहेत. त्यापैकी माझे पाहण्यांतही बरेच आले आहेत. आणि त्यातील शूद्रांनी कमविलेल्या मोत्या-पोवळ्यांचा चारा चरणारे भागवती, गोब्राह्मणास दादोजी कोंडदेवास फाजील आगंतुकी करावयास लावल्यामुळे तसल्या पवाड्यांचा मी संचय केला नाही."[४] तत्कालीन ब्राह्मणवर्ग कशा पद्धतीने शिवाजी महाराजांना माध्यम बनवून धादांत खोटा इतिहास पोवाड्यातून आणत होते, हे महात्मा फुले यांनी जाणले होते.

**भाषिक दृष्टिकोन -**

जोतीराव फुले यांनी आपल्या पोवाड्याच्या प्रारंभी जी प्रस्तावना दिली आहे. त्यामध्ये त्यांनी आपली भाषिक भूमिका अगदी स्पष्टपणे मांडली आहे. अत्यंत सोपी, सुलभ अशी बोलीभाषा पोवाड्यात महात्मा फुले योजतात. शिवरायांचे स्वरूपाचे वर्णन पाहा,

सरळ नीट नाक विशाल डोळ्यां शोभले।
विषादे मृग वनीं गेले ॥
नेत्र तीखे बाणी भवया कमठे ताणीले।
ज्यांनी चंद्रा हटविले ॥
सुंदर विशाल भाळवरी जावळ लोंबले।
कुरळे केंस मोघीले ॥ (म. फुले समग्र वाङ्मय)

शिवरायांच्या स्वरूपाचे वर्णन करतानादेखील अगदी सुलभ भाषा वापरली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, "लांबच लांब मोठाले संस्कृत शब्द मुळीच घातले नाहीत व जेथे माझी उपाययोजना चालेना तेथे लहानसहान शब्द निर्वाहापुरते घेतले आहेत. माळी कुणब्यास समजण्याजोगी सोपी भाषा होण्याविषयी फार श्रम करून त्यांस आवडण्याजोग्या चालीने रचना केली आहे."[५] महात्मा फुले यांच्या 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' याची भाषा ही त्यांच्या लेखनाच्या एकूण ज्या प्रेरणा आहेत त्या प्रेरणांशी सुसंगत आहे. तत्कालीन साहित्य जगताची भाषा न स्वीकारता त्यांनी लोकांच्या तोंडची, बोलीभाषा वापरली. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "साधी, सोपी, अनलंकारिक भाषा म. फुले पसंत करीत असले तरी उपहास आणि उपरोध ही त्यांच्या लेखनाची खास वैशिष्ट्ये आहेत."[६] महात्मा फुले यांची भाषा ही स्वतंत्रपणे वापरलेली बोली आहे. त्यांच्या इतर भाषेत सामान्य माणसांविषयी मनात असलेली आंतरिक जशी तळमळ आहे तशीच प्रस्तुत पोवाड्यात शिवाजी महाराजांचे चरित्र सांगून या राजाचा आदर्श लोकांसमोर सोप्या, सुलभ भाषेत आणणे हादेखील हेतू आहे.

**व्यापक भूमिका -**

छत्रपती शिवाजीराजे हे कुळवाड्यांचे भूषण आहेत. हे महात्मा फुले आपल्या पोवाड्यातून वेळोवेळी ठासून सांगतात. काही वेळापुरते मनोरंजन घडवून आणावे ही 'पोवाडा' लिहिण्यामागची त्यांची प्रेरणा नाही, डफावर थाप टाकून शाहिरीत नाव मिळवावे, इतक्या छोट्या संकुचित विचाराने त्यांनी पोवाडा लिहिलेला नाही, तर आपल्या आदर्श राजाचा इतिहास कथन करून कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांना जागे करावे, त्यांना सामाजिक चेतना द्यावी. गोब्राह्मण प्रतिपालक या विशेषणामुळे त्यांचे कर्तृत्व सीमित होत आहे हे काही ब्राह्मण जाणीवपूर्वक करीत आहेत,



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

याची जाणीव महात्मा फुले यांना झाली होती, म्हणून शिवरायांची खरी प्रतिमा लोकांसमोर यावी ही त्यांच्या पोवाडा लेखनाची प्रेरणा व व्यापक भूमिका होती.

कुळवाडीभूषण पवाडा गातो भोसल्याचा।
छत्रपती शिवाजीचा ॥
लंगोट्यास देई जानवी पोषिंदा कुणब्यांचा।
काळ तो असे यवनाचा ॥

अशा अत्यंत सोप्या सुलभ भाषेत; पण बहारदारपणे पोवाड्याचे लेखन महात्मा फुले करतात. पुढे मालोजी, शहाजी, जिजाबाई यांचा नामोल्लेख करून जिजाबाई यांच्या पोटी हे रत्न शिवनेरी किल्ल्यावर जन्माला आले, असे सांगतात आणि प्रत्यक्ष शिवरायांच्या स्वरूपाचे आपल्या खास शैलीत वर्णन करतात.

जिजाबाई यांच्या पोटी जन्मलेल्या या पुत्ररत्नाचे नखे, बोटे शुभ्र आहेत. इतके शुभ्र आहेत की, त्याच्या कांतीमुळे कमळांनादेखील लाजविले, असे काव्यात्म वर्णन आले आहे. स्फटिकाप्रमाणे पोटऱ्या आणि बांधा, सिंहाप्रमाणे छाती व लहान कंबर, राजहंसाप्रमाणे रुबाबदार मान, मोत्यांची लडी गुंफल्याप्रमाणे शुभ्र दंतपक्ती, आरक्त नाजूक ओठांत लपलेले हास्य, सरळ नाक, टपोरे डोळे हे पाहून हरणांनी जंगलाचा आश्रय घेतला, असे काव्यमय शिवराय जोतिबा रेखाटतात. बाणाप्रमाणे धारदार तीक्ष्ण दृष्टी, धनुष्याप्रमाणे भिवया इतक्या रेखीव की, त्याने चंद्राला लाजविले. हे वर्णन पोवाड्याच्या सुरुवातीला महात्मा फुले करतात. कथानकात मालोजीराजे भोसले यांचे शौर्य, पराक्रमी वृत्ती, चाणाक्षपणा, वैचारिकता, राजनीती निपुणता याचे वर्णन येते. मात्र, दैव बलवत्तर नसेल तर काय करणार? म्हणून मालोजीराजांनी यवनांची चाकरी स्वीकारली, असा खेद ते व्यक्त करतात.

बाल शिवाजीचे चित्रण करताना महात्मा फुले म्हणतात, हळूहळू शिवाजी मोठा होऊ लागला, तसा तालमीत जाऊ लागला. घोडेस्वारी, कुस्ती, भाला, पुरीगदग्या, दांडपट्टा, अशा अनेक खेळांत शिवराय तरबेज झाले. माता जिजाऊ यांनी शिवरायांना पराक्रमाच्या गोष्टी सांगितल्या. पूर्वजांचा इतिहास सांगितला. आर्य हे परके आहेत. त्यांनी मूळच्या क्षेत्रजाला जिंकले आणि दास केले. तुम्ही मूळ क्षेत्रज होतात म्हणून तुम्हाला क्षत्रिय म्हणतात आणि आता तुम्हाला ब्राह्मण शूद्र म्हणत आहेत. आम्हा मातांच्या मनाला या गोष्टी आवडत नाहीत. त्यामुळे आम्हांला दु:ख होत आहे.

शुद्र म्हणती तुम्हा हृदयी बाण टोचले।
आज बोधाया फावले ॥
गाणें गाते ऐक बाळा तुझ्या आजोळी शिकले।
बोली नाही मन धालें ॥

जिजामातेच्या मन:स्थितीचे अत्यंत हृदयद्रावक चित्रण महात्मा फुले करतात. पूर्वी क्षेत्रजांचे आपल्या पूर्वजांचे जे राज्य होते ते अतिशय समृद्ध होते. परक्या आर्यांनी या देशाचे पार वाटोळे केले. क्षेत्रजांच्या काळात डोंगर, वृक्ष, दऱ्याखोऱ्यांतून वाहणारे निरंतर निर्मळ पाणी, सदाबहार झाडे, सुगंधी वारा, मंजुळ, मनोहर आवाजात गाणारे पक्षी याचे वर्णन करताना जोतीरावांच्या काव्याला अधिकच धुमारे फुटतात,

नदी नाले सरोवर, शोभे कमळांचा भार।
पक्षी गाती सोळा स्वर, मंजूळ वाणी मनोहर ॥
भूमी अति काळसर, क्षेत्र देई पिका फार ॥
झाडा फुलें झाला भार, सुगंधी वाहे लहर ॥

अशा समृद्ध परंपरेत परकीय आर्यांनी केलेल्या स्वाऱ्या, घातलेला धुमाकूळ, अत्याचार याचे जोतीरावांनी खास आपल्या शैलीत वर्णन केले आहे.

**स्त्री-समानता दृष्टिकोन -**

जोतीरावांची स्त्रियांविषयी असलेली समदृष्टी पोवाड्यात प्रसंगानुरूप व्यक्त होते. शहाजीराजांनी दुसरे लग्न करून 'सवत' आणली म्हणून जिजाबाईंनी खूप शोक केला. मात्र, या गोष्टीचा शिवरायांच्या बालमनावर त्यांनी यत्किंचितही परिणाम होऊ दिला नाही. हे जोतीराव ठासून सांगतात, तसेच शहाजीराजांच्या कैदेप्रसंगी जेव्हा ते सरस ठरले, तेव्हा त्या राजनीतीमागे राणी सईबाईचा सल्ला असल्याचे सांगून एका वेगळ्या आणि उपेक्षित स्त्री सूत्रधाराला न्याय देतात.

साजे नाव सईबाई स्त्री सुचवी पतीस।
ताडा दंडी दुसमानास ॥
स्त्रीची सुचना सत्य भासलीं लिहिलें पत्रास।
पाठवी दिल्ली मोगलास ॥

अर्थात, सईबाई शिवरायांना सांगतात, 'शरण न जाता दुश्मनाला चांगली अद्दल घडवा' हा सईबाईंचा सल्ला शिवरायांना पटतो आणि मग दिल्लीच्या बादशहाला ते पत्र लिहितात, 'माझ्या पित्याला सोडा' मीच तुमच्या चाकरीला येतो.



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

शहाजीराजांचे बहुपत्नीत्व महात्मा फुले यांना आवडले नाही. येथे त्यांचा स्त्री-समता दृष्टिकोन स्पष्टपणे दिसतो. या प्रसंगाला त्यांनी उपहासाने 'सवत सोहळा' म्हटले आहे. जिजाबाईच्या छातीवर अनेक दु:खांच्या शिळा ठेवतात. या शिळा म्हणजे प्रत्येक भारतीय स्त्रीच्या शिळा आहेत, असे संबोधून अत्यंत हृदय पिळवटून टाकणारे वर्णन जोतीराव करतात.

मनी भिऊन पित्याच्या कुळा ।
पळ काढला गेले मातुळा ॥
छातीवर ठेवल्या शिळा ।
नाहीं रूचला सवत सोहळा ॥

**राज्यरोहणाचा प्रसंग संक्षिप्त स्वरूपात -**

शिवचरित्रातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा प्रसंग म्हणजे राज्याभिषेक. हा सोहळा साधारण महिना-दीड महिना रायगडावर सुरू होता. ६ जून १६७४ वार शनिवार रोजी हा सोहळा पार पडला. स्वराज्याचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी स्वकीय आणि परकीय राष्ट्रांनी राजा म्हणून क्षत्रिय म्हणून मान्यता देण्यासाठी राज्याभिषेक करून घेण्याचा सल्ला दिला होता. त्या कार्यासाठी त्याचवेळेस पैठणला आलेले गागाभट्ट यांचे नाव सुचविले. यथाविधी वैदिक मंत्रोच्चाराने राजांना सिंहासावर बसविले. त्यांना मुकुट धारण करून राज्याभिषेक पार पडला. 'राजाशिवछत्रपती' अंकित असे नाणे सुरू केले. या सोहळ्याला इंग्रजांचा प्रतिनिधी हेन्री आक्झिंडेन उपस्थित होता. याप्रसंगी प्रचंड दानधर्म करण्यात आला.

हा प्रसंग जोतीराव फुले यांनी मात्र चार ते सहा ओळींत वर्णन केला आहे. खरेतर या प्रसंगाचे जोतीरावांनी विस्ताराने वर्णन करायला हवे होते; मात्र तसे झाले नाही. हजाराच्या वरती पोवाड्याच्या ओळी आहेत. त्यामध्ये शंभर-दोनशे तरी ओळींत राज्याभिषेकाचे वर्णन यायला हवे होते; पण तसे झाले नाही. यासंदर्भात जी. ए. उगले म्हणतात, "बाल शिवबाचे वर्णन, तानाजी-बाजीप्रभू हौतात्म्य प्रसंग,आग्र्याहून सुटका आदी प्रसंगांत फुले रमले. राज्याभिषेक प्रसंगाची त्यांनी केवळ सहा ओळीत बोळवण केली आहे."[7] राज्याभिषेक आणि गागाभट्ट यांच्या अनुषंगाने अनेक दंतकथा काही ढोंगी शिवभक्त जाणीवपूर्वक पुढे आणीत होते. हे महात्मा फुले यांनी पुरते जाणले होते. समाजात हा दंतकथात्मक इतिहास मध्यंतरी आणि काही प्रमाणात आजही सामान्य लोकांमध्ये जाणीवपूर्वक रुजवला जात आहे. जणू काही गागाभट्ट या पुरोहिताचे स्वराज्य स्थापनेत फारच मोठे योगदान आहे. यासंदर्भात प्रभाकर वैद्य लिहितात, "कारण आज त्या निमित्ताने एक नवी दंतकथा इतिहास म्हणून खपवून नेण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो. ती म्हणजे गागाभट्टासंबंधी. जणू काय गागाभट्ट जन्मभर स्वराज्य स्थापनेच्याच चिंतेमध्ये मग्न होता, जणू काय शिवछत्रपतींच्या प्रयत्नांना समांतर असे त्याचेही प्रयत्न त्याच्या परीने, जन्मभर चालूच होते असा भास काही तथाकथित शिवभक्त निर्माण करीत आहेत. या मंडळींच्या या नव्या दंतकथनाच्या उपक्रमास उतारा म्हणून फुल्यांच्या पोवाड्यातील गागाभट्टासंबंधीचा उल्लेख वाचनीय ठरेल."[8]

काशीकर गंगाभट घाली डौल धर्माचा ।
केला खेळ गारूड्याचा ॥
बहुरूपी सोंग तुलादान सोंने घेण्याचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥

शिवराय आणि त्यांचे सहकारी यांनी अतिशय परिश्रम आणि कष्टाने मिळविलेल्या स्वराज्याला गागाभट्टाने विनासायास, विनापरिश्रम, दान-धर्माच्या नावाखाली लुटले. ही प्रवृत्ती जोतीराव फुलेंना उलट खटकली म्हणून गागाभट्टांना त्यांनी 'गारूडी' म्हटले आहे. एवढेच कमी की काय? २४ सप्टेंबर १६७४ रोजी निश्चलपुरी गोसावी यांच्याकडून तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक केला; पण हा पुरोहित मात्र महात्मा फुले यांच्या तडाख्यातून सुटला.

चाकण कोंडाणा सर करण्याचा प्रसंगाचे जोतीरावांनी केलेले वर्णन अत्यंत सूक्ष्म, तरल असे आहे. अफझलखानास ठार मारण्याचा प्रसंग आणि शिवरायांचा मुत्सद्दीपणा, परिस्थिती सापेक्षपणा, दूरदृष्टी याचे वर्णन ते आपल्या खास शैलीत करतात, "अफझलखानास भोळा या विशेषणाऐवजी घमेंडी, अहंकारी असे विशेषण बहाल केले असते तर ते अधिक यथोचित झाले असते असे जोतीराव फुले यांच्या साहित्याचे अभ्यासक जी. ए. उगले म्हणतात."[9] पन्हाळगड, विशालगड या प्रसंगाचे वर्णन करून औरंगजेब बादशहाचे 'काळे कारनामे' जोतीराव कठोर शब्दांत सांगतात,

जीधर उधर मुसलमानी । बीसमिलाहि हिमानी ॥
सच्चा हरामी शैतान आया । औरंगजेब नाम लिया ॥

जोतीराव पुढे कथानकात बाजी घोरपडे यांच्या कपटाचा बदला, सुरत लूट, आग्रा भेट व सुटका, प्रतापराव गुजर यांचा



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

पराक्रम व हौतात्म्य आणि कनार्टक मोहीम, यंकोजीची भेट, दासीपुत्र बंधू संताजीला कर्नाटक प्रातांचा दिलेला कारभार, याचे वर्णन परिणामकारकरीत्या केले आहे.

शिवाजी महाराज गुडघी रोगाने त्रस्त झाले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. यवनांना ही बातमी कळल्यानंतर आनंद झाला. 'काळाला हूल देऊन स्वत: गेला स्वर्गाला। पडले सुख यवनाला ॥' अशा नेमक्या आणि मोजक्या शब्दांत त्यांच्या मृत्यूसमयाचे वर्णन करतात. अतिशय रोखठोक, खटकेबाज, 'बाज' असलेली जोतीरावांची भाषा शिवरायांच्या मृत्यूनंतर कारुण्यमय होते.

महाराज आम्हांसी बोला।
धरला का तुम्हीं अबोला ॥
मावळे गडी सोबतीला।
शिपाई केले उघड्याला ॥
सोसिले उन्हातान्हात।
भ्याला नाही पाऊसाला ॥
डोंगर कंगर फिरला।
यवन जेरीस आणला ॥

कुळवाडीभूषण -

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वास्तव इतिहासाचे दैवतीकरण करून त्यांचे लौकिक किंबहुना ऐहिक कर्तृत्व नाकारण्याचा प्रयत्न मधल्या काळात काही लोकांनी केला. तसेच त्यांची प्रचलित पोवाडा, दंतकथा, टी.व्ही. वाहिन्या, यांमधून गो-ब्राह्मण प्रतिपालक, हिंदवी स्वराज्य संस्थापक अशी बिरुदे लावून त्यांना विशिष्ट धर्मात, वर्णात, जातीत खेचून त्यांच्या कार्याचा व्यापक दृष्टिकोन, लोककल्याण, वैश्विकता, सर्वसमावेशकता, समता या मूलभूत तत्त्वनिष्ठ धारणेला छेद देण्याचे काम केले जात आहे, ते अत्यंत निंदणीय आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी गो-ब्राह्मण प्रतिपालक, हिंदवी स्वराज्य संस्थापक, अवतारी पुरुष या बिरुदावल्या गाळून टाकल्या. त्याऐवजी 'कुळवाडी भूषण' बिरुदावली त्यांनी राजांना बहाल केली आहे. याशिवाय दादोजी-रामदास शिष्य, तुळजाभवानीचा आशीर्वाद प्राप्त झालेला भाग्यवान असे पारंपरिक दृष्टिकोन स्वीकारलेले नाहीत. त्यांच्या मते शिवाजी महाराज हे स्वत: निष्ठावान सहकारी लाभलेले शूरवीर होते. सर्वार्थाने अब्राह्मणी राजांच्या परंपरेत शिवाजीला बसविताना जोतीरावांनी बळी परंपरा मांडली आहे. 'लंगोट्यास देई जानवी पोशिंदा कुणब्यांचा' असा गौरव ते करतात. गो-ब्राह्मण प्रतिपालनाशी शिवाजीराजांना जखडून ठेवणाऱ्यांना जोतीराव म्हणतात,

युद्धी नाही विसरला। लावी जीव रयतेला ॥
टळेना रयत सुखाला। बनवी नव्या कायद्याला ॥
दाद घेई लहानसानाची। हयगय नव्हती कोणाची ॥

उपरोक्त पद्य पंक्तीत शिवाजीराजांची व्यापक भूमिका स्पष्टपणे दिसते. "ब्राह्मणी परंपरेतील लेखकांनी शिवाजीची आपल्या सोयीची प्रतिमा जाणीवपूर्वक उभी केली आहे. याच महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी शूद्र म्हणून शिवाजीस राज्याभिषेक नाकारला होता, हा इतिहास कोणीही विसरले नाहीत."[१०] असे यशवंत मनोहर म्हणतात. कुणबी संस्कृतीच्या शूर राजाचा गौरव जोतीरावांना करावयाचा आहे. त्यांचे कर्तृत्व सर्वसामान्य जनतेसमोर खऱ्या स्वरूपात आणायचे आहे.

थोडक्यात शिवाजीराजे हे बहुजनांचा राजे आहेत. बळीराजासारखेच स्थान शिवरायांना जोतीराव देतात. शिवाजीराजांच्या पश्चात सामान्य जनतेची दिशाभूल करून राजाचा खरा इतिहास समोर न येऊ देणे ही जी तत्कालीन ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांची भूमिका होती तिला जोतीरावांनी या 'कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' लिहून एकप्रकारे चपराक दिली, असे म्हणावे लागेल. यासंदर्भात डॉ. जे. व्ही. नाईक यांनी रोझालिंड ओ हॅन्लन यांची भूमिका पुढीलप्रमाणे मांडली आहे. छत्रपती शिवाजींवरील पोवाड्यातील आशयाच्या अन्वयार्थाकडे अगदी बरोबर निर्देश करून रोझलिंड म्हणतात, "फुल्यांनी विलक्षण नवा आणि संपूर्ण ब्राह्मणविरोधी असा तडफदार दृष्टिकोन महाराष्ट्राच्या इतिहासाला आणि संस्कृतीला दिला."[११] अर्थात या कुळवाड्यांच्या भूषण राजाला जी सनातन मंडळीच्या चक्रव्यूहातून बाहेर काढून स्त्री-शूद्र अतिशूद्रांना समजेल अशा भाषेत हा रांगडा राजा जोतीरावांनी रांगड्या पद्धतीने चित्रित केला आहे. यापेक्षाही या पोवाड्यांचे अनेक पैलू प्रकाशात आणता येतील.

छत्रपती शिवरायांची भूमिका ही अगदी सरळ होती. बहुजनांना (मावळे) विश्वासात घेऊन जे स्वराज्याचे अतुलनीय कार्य तडीस न्यायचे होते ते महनीय कार्य त्यांनी आपल्या विश्वासू मावळ्यांना घेऊन केल्याचे जोतीराव सांगतात, तसेच ते व्यवहारी, कुशल, निपुण अशा शिवाजीराजाला कोण्या दादोजी



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

कोंडदेवाची किंबहुना त्यांच्या मार्गदर्शनाची गरजच काय?

मासा पाणी खेळे गुरू कोण असे त्याचा? ।

पवाडा गातो शिवाजीचा ॥

असा प्रश्न निर्माण केला व शिवाजीराजांचे गुरुपद दादोजी कोंडदेवाकडे देऊन यशाचे श्रेय त्या ब्राह्मणांना देण्यास महात्मा फुले यांचा विरोध आहे. अशीच काहीशी भूमिका रामदासासंदर्भात मांडली आहे. 'लोक प्रीती करिता करी गुरू रामदासास' यावरून ते केवळ चर्चा असावी. राज्याभिषेकालादेखील रामदास हजर नव्हते. म्हणून त्यांनी संत रामदासासदेखील शिवाजीराजांचे गुरुत्व देण्यास नकार दिला आहे. म्हणूनच डॉ. रमेश शिंदे म्हणतात, "ब्राह्मणी सांस्कृतिक राजकारणाला अब्राह्मणी सांस्कृतिक राजकारणाच्या परिभाषेत जोतीरावांनी दिलेले सडेतोड उत्तर म्हणजे शिवाजींचा पोवाडा होय. या पोवाड्याच्या ओळीओळीतून जोतीराव फुले यांनी छत्रपती शिवरायांच्या सुसंस्कृतपणावर प्रकाशझोत टाकला आहे."[१२] प्रस्तुत पोवाड्याचे समकालीन महत्त्व स्पष्ट करताना डॉ. आनंद पाटील म्हणतात, "एवढ्या विशाल परिप्रेक्ष्यात फुल्यांचा 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' आज अभ्यासला पाहिजे. तो आज कुठेही सार्वजनिक कार्यक्रमात गल्ल्या गाजवणाऱ्या लाऊडस्पीकरवर वाजवला जात नाही. उलट मुस्लीम विरोधातील शिवाजींच्या लढायांचे भावुक व घाऊक नाट्यमय वर्णन करणाऱ्या मराठ्यांची पोकळ छाती उगाच फुगवणाऱ्या बालिश पोवाड्यांचीच संख्या अपार दिसेल." डॉ. आनंद पाटील यांनी या पोवाड्याचे महत्त्व स्पष्ट करताना आजच्या पोवाड्यांच्या विश्वासार्हतेसंदर्भात अशी खंत व्यक्त केली आहे.

प्रस्तुत पोवाड्याच्या अनुषंगाने येथे काही निरीक्षणे नोंदविता येतील.

- कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांच्या हा 'पवाडा' उपयोगी पडावा हे पोवाड्याचे प्रयोजन जोतीरावांनी प्रारंभीच सांगितले आहे. हा ब्लॅक प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्राचा पहिला हुंकार जोतीरावांनी प्रथमच आणला हे डॉ. आनंद पाटील म्हणतात हे अन्वयार्थकच आहे.
- जोतीराव फुले 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' लिहून अनेक वासाहतिक विरोधाभासावर प्रकर्षाने प्रकाश टाकला आहे.
- लोकोत्तर वीरपुरुष, स्वराज्य संस्थापक, कल्याणकारी राज्यकर्ता, ही अशी शिवरायांची प्रतिमा आपल्या पोवाड्यातून उभी केली.
- प्रचलित पोवाडे, दंतकथा व इतर काही लेखन याद्वारे गोब्राह्मण प्रतिपालक, हिंदवीस्वराज्य संस्थापक, हिंदुपदपादशाह, अशी बिरुदे लावून शिवरायांचे कार्य संकुचित करण्याचा जो काही धर्मांध, अंधशिवभक्त यांनी घाट घातला आहे, अशा लोकांनी जोतीरावांनी संपूर्ण पोवाड्यातून खणखणीत चपराक मारलेली आहे. शिवरायांना ते 'कुळवाडीभूषण' म्हणून संबोधतात.
- छत्रपती शिवाजी म्हणजे सामान्य, बहुजन, शेतकरी, अठरापगड जनजाती, स्त्री-पुरुषाचा सर्वसमावेशक लोककल्याणकारी राजा ही प्रतिमा संपूर्ण पोवाड्यातून उभी करून राज्याचा इतिहास सांगतात.
- शिवरायांनी जे स्वराज्य स्थापन केले ते ब्राह्मण पंडितांच्या बोधामृत, बालामृताने नव्हे; तर नेतृत्व, विश्वासू सहकाऱ्यांचे योगदान यामुळे होय. ही जोतीरावांची ठाम भूमिका आहे.
- जोतीराव शिवरायांना बळीच्या परंपरेत बसवितात. बळी परंपरा मोठ्या ताकदीने मांडतात.
- राज्यरोहणाप्रसंगी गागाभट्ट, निश्चलपुरी गोसावी आदी ब्राह्मणवर्गाने अमाप धनद्रव्य उकळले. ही गोष्ट जोतीरावांना आवडलेली नाही. म्हणून ते इतका मोठा प्रसंग असूनदेखील त्या विषयाचे वर्णन न करता मात्र चार-सहा ओळीत उल्लेख करतात.
- जोतीरावांनी आपल्या पोवाड्यातून 'शिवराय म्हणजे अवतारी पुरुष, भवानीचा साक्षात्कार' अशा भाकडकथांना कटाक्षाने टाळले आहे. त्यामुळे हा पोवाडा वस्तुनिष्ठतेला पात्र ठरला आहे.
- प्रसंगानुरूप आपल्या कुशल राजनीतीमध्ये राणी सईबाईंचा 'साजे नांव सईबाई स्त्री सुचवी पतीस ताडा दंडी दुसमनास' हा सल्ला शिवरायांनी घेतला. एकूणच पोवाड्यातून शिवरायांचा स्त्रीविषयक समतावादी दृष्टिकोन मांडला आहे. सईबाईसारख्या उपेक्षित सूत्रधाराला त्यांनी प्रकाशात आणले आहे.



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

- संत रामदास, दादोजी कोंडदेव यांचा गुणगौरव जोतीरावांना मान्य नाही. 'मासा पाणी खेळे गुरू कोण असे त्याचा' अशा ओळीतून ते सरळ-सरळ दादोजी आणि रामदासांचे गुरुत्व नाकारतात. पुढे न. र. फाटक ते मा. म. देशमुख, हरी नरके आदि अभ्यासकांनी ही गुरूपदे खालसा केली व न्यायालयाने त्यावर अंतिम निकाल देऊन कायमचा घाव घातला. यासंदर्भात आजच्या परिस्थितीत छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या पोवाड्याची उत्तराधुनिक मीमांसा होणे गरजेचे आहे, असे वाटते.
- जोतीरावांनी क्षेत्रीय शब्दाला शेतकरी संस्कृतीतून पाहिलेले आहे. क्षेत्र जागा किंवा शेत अशा क्षेत्रांचा मालक क्षेत्रीय, असे डॉ. जे. व्ही नाईक म्हणतात.
- भाषेच्या संदर्भात जोतीरावांनी माळी-कुणब्यांस समजण्याजोगी सोपी भाषा परिश्रमपूर्वक, जाणीवपूर्वक वापरली आहे. हे या पोवाड्याचे भाषिक वैशिष्ट्ये सांगता येईल. म्हणजेच पोवाड्याचा बाज, भाषा, ठसका अगदी बहुजन-सर्वसामान्यांना समजेल असा आहे.

संदर्भ -


१) कीर धनंजय / मालशे स. ग., 'महात्मा फुले समग्र वाङ्मय, १९६९, पृ. ७

२) गुंदेकर श्रीराम, 'महात्मा जोतीबा फुले : विचार आणि वाङ्मय', प्रतिमा प्रकाशन, प्र. आ. ऑगस्ट १९९२, पृ. १६०

३) मनोहर यशवंत, 'संग्रामनायक जोतीराव फुले', सनय प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९ फेब्रुवारी २०२१, पृ. ८६

४) 'महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय', उनि, पृ. ४०६

५) कोत्तापल्ले नागनाथ, 'जोतिपर्व', स्वरूप प्रकाशन, प्र. आ. जुलै २०००, पृ. ३५

६) उगले जी. ए., 'महात्मा फुले - एक मुक्त चिंतन', कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ., २८ नोव्हें २०००, पृ. १११

७) वैद्य प्रभाकर, 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा (प्रेरणा-शिकवण-विपर्यास)', लोकवाङ्मयगृह, प्र. आ. ऑक्टो, १९७४, पृ. २८९

८) मनोहर यशवंत, 'संग्रामनायक जोतीराव फुले', उनि, पृ. ८६

९) नरके हरि (संपा.), 'महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा', जोतीराव, परमहंस आणि प्रार्थना समाज - डॉ. व्ही. नाईक, पृ. २५६

१०) शिंदे रमेश, 'महात्मा जोतीराव फुले यांचे राजकीय विचार', सायन, पब्लिकेशन्स, प्र. आ., ऑगस्ट २०१५, पृ. ६४

११) पाटील आनंद, 'महाराष्ट्राला माहीत नसलेले सम्राट शिवाजी', आनंद ग्रंथसागर प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २०१९, पृ. २७८


❖❖❖❖❖





Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad